१९१९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ३४३

# शंकरपरिणय.

REFBK-0001688
REFBK-0001688

१८१८

काव्य. ५७

स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे.

( खासगी मित्रमंडळींत वाटण्याकरितां )

# शंकरपरिणय

अर्थात्

त्या प्रसंगासाठी तयार केलेला एक

# गोंधळ.

१६८८

REFBK-0001688
REFBK-0001688

तो

रचणारा शाहीर,

घालणारा गोंधळी, लिहिणारा लेखक,

छापणारा मुद्रक आणि प्रसिद्ध करणारा प्रकाशक,

यशवंत भास्कर जठार, बी. ए., एल्एल्. बी.

१९१९

AT THE KARNATAK PRINTING WORKS
DHARWAR.

——————————————————————— यांस.

काशीताई वरति तुमचा लोभ, वा शंकराला
प्रेमें तुह्मी सतत बघता, स्थान वा द्यावयाला।
माते चित्तीं सवड तुमच्या या मुळें पुस्तकाला
तुह्मापाशी विनयमतिनें धाडिले घ्या तयाला ॥१॥

धारवाड,
ता. ३०-४-१९२०.

य. भा. जठार

# दोन शब्द.

कवितेंतलीच प्रस्तावना वाजवीपेक्षां जास्त वाढली तरी देखील या काव्याचा प्रसंगच सांगण्याचें राहिलें !

गेल्या ( १९१९ ) फेब्रुवारीमध्यें माझे मावस बंधु

**चि. रा. शंकर बाळाजी ढवळे,**

आय्. सी. एस्.

यांचा विवाह सुप्रसिद्ध गोखले यांच्या कन्या

**श्री. काशीताई गोखले**

(आतांच्या श्री. सौ. आनंदीबाई ढवळे)

यांच्याबरोबर झाला. त्यावेळीं ही काव्यगंगा उगम पावली. एवढें सांगितलें म्हणजे मी वाचकांच्या ऋणांतून मुक्त झालों, म्हणावयाचें !

चि. शंकराचे अस्सल साहेब होऊं घातलेले स्नेही व माझ्यासारखा निर्भेळ नेटिव्ह यांचा सांधा जुळवून देणारा एक उभयान्वयी दुवा असावा असें माझ्या मनांत होतें. त्या प्रमाणें या गोंधळांत माझी री ओढण्याचें काम मी माझा मामेभाऊ चि. रा. गणपतराव भाटे, एम्. ए. (एडिन्) प्रोफेसर, पाटना कालेज, याच्या गळ्यांत बांधणार होतों. पण हा डाव फसला ! तेव्हां या वेड्यांच्या बाजारांत मी एकटाच राहिलों. तरी पण या कवितानायकाचेंच मला पाठबळ आहे या विश्वासावर माझ्या या कविताकन्येनें कुठेंही जाण्यास कां भ्यावें ?

'बंड्या,' 'तात्या' 'मोरुभाऊ' इत्यादि मंडळी कोण हें मीं सांगितलें असतें तर बरें झालें असतें. पण आतां राहूंद्या.


क. प्रिं. वर्क्स, धारवाड.
१० फेब्रुवारी १९२०

**य. भा. जठार.**

KARNATAK PRINTING WORKS,

DHARWAR.

सं.काव्य १७



# अर्पण

१६८८

॥ दिंड्या ॥

काय लिहिलें कीं काय सोडिलें तें
परत बघणें हें मज न तोष देतें.
कल्पनाही अत्यल्प, काव्यदेवी
त्यांत मजवर अनिवार लोभ ठेवी! ॥ १ ॥

म्हणुनि वेडावांकडा हा फुलांचा
हार आहे तैसाच अर्पण्याचा
बेत केला, घेवोनि कंठिं याला
शंकरा, दे संतोष मन्मनाला. ॥ २ ॥

नसे दुसरा मजजवळिं द्यावयाला
कवि दरिद्री मी, म्हणुनि हीच माला
घेइ आनंदी, घाल तूंहि कंठीं
कांतसमवेता, काल सुखें कंठीं. ॥ ३ ॥

तुला दिधली वा काय शंकराला
सर्व पोंचे आनंदिशंकराला;
भेद अपुला हा उगिच बोलण्याला;
द्वैत गेलें तुम्हि एक अतां झालां. ॥ ४ ॥

# प्रस्तावना

॥ आर्या ॥

चांडालवदन, भूपानन, वन, उपवन, असो समानमन
करुनी आनंदानें नांदे त्या शारदेस मम नमन. ॥ १ ॥

कवितादेवी, मजवरि आजवरी तूं कधीं न भुललीस ;
परि एकदां मला तव नादें त्वां आणिलेंस जेरीस. ॥ २ ॥

होतों लहान तेव्हां हौस मनीं कीं कवित्व मिरवावें,
म्हणुनी आशेनें मीं लेखनसाहित्यसज्ज बैसावें, ॥ ३ ॥

तों कल्पना मनीं मम येतां येतां न एकही यावी ;
आली एखादी तरि, पद्यार्धाही पुरी न ती व्हावी ; ॥ ४ ॥

झालें, अशांत कांहीं आलें चित्तीं विचार जरि त्यांना
शब्दांनीं अडवावें न्यावें वा आड ओढुनी रानां. ॥ ५ ॥

स्वकपोलकल्पनायुत कवितांचा सोडुनी दिला नाद ;
संस्कृत आंग्ल कवींच्या कृतिचा मग घेउं लागलों स्वाद. ॥ ६ ॥

हेतू मनांत हा कीं भाषांतर जाहलें तरी काय,
वामनपंडितसम कवि होण्याला हाचि सुलभ सदुपाय. ॥ ७ ॥

त्यांतुनि त्या काळीं त्या कविला इंग्रेजि येतही नव्हतें
मग काय छान आतां, नाहीं अनुकूल दैव यापरतें. ॥ ८ ॥

ठरली विचारसरणी झाला निश्चय लगेच पूर्ण मनीं,
'कां गे कवितादेवी, आतां म्हणतेस काय बोल झणी ?' ॥ ९ ॥

गर्वानें मी वदलों, माझ्या आशाळभूत नेत्रांना
दिसली कवितादेवी स्वप्नीं मजला प्रसाद देतांना. ॥ १० ॥

स्वप्न स्वप्न खरें तें प्रत्यय जागेपणीं कसा यावा ?
प्रत्यक्ष येइ अनुभव, जाती कीं यत्न सर्व मम वाया. ॥ ११ ॥

समवृत्त संस्कृताचें भाषांतर तेवढेंच तें गोड
वाटावें, परि यमकाभावीं कांहीं सुचूं नये तोड. ॥ १२ ॥

अमुकचि वृत्त असावें बंधन हें दूर म्यां झुगारून
घ्यावी आंग्लकवीची कविता मग नीट एक शोधून. ॥ १३ ॥

पहिला चरण कसातरि व्हावा, इतुक्यांत मूळ अर्थाला
हरताळ लावणारा यावा वृत्तांत कांहिं घोटाळा. ॥ १४ ॥

शब्द न करिती मैत्री वृत्तासह, अर्थ शब्द मानी न
सगळे बेटे म्हणती 'मी कां सत्याग्रहासि सोडीन?' ॥ १५ ॥

वाक् अर्थ पार्वतीपरमेश्वरसंपृक्तभावरतिविरत
मम कवनीं रत कदनीं, शंकरभिल्लीणसम सतत दिसत. ॥ १६ ॥

गेलीं कांहीं वर्षें तेव्हां हा आपुला नव्हे धंदा,
ऐसा निश्चय केला, मग या सोडोनि टाकिलें छंदा. ॥ १७ ॥

तरिही केव्हां केव्हां जरठाला जशि हुरूप लग्नाची
येते तशीच मजही वृत्तें घोटित उगीच बसण्याची ॥ १८ ॥

वृद्धास पुत्र व्हावा तैसेंही मग कधीं कधीं घडतें
ना तरि विचार हे मीं आर्यावृत्तांत गोंविले नसते. ॥ १९ ॥

तरी, हे कवितादेवी ! फसवावें मजसमान कवणा न;
ऐक गळ्याची माझ्या प्रेमें ही घातली तुला आण. ॥ २० ॥

॥ साक्या ॥

धूमकेतुसम कधीं कधीं ही उदयाला येणारी,
कविताकामिनि शंकरपरिणयकालीं येउनि वारी, ॥ २१ ॥

सं. आर्य २०१८



संशय माझ्या एक मनींचा ; ' ढवळे शंकरराया
दे मज द्याया आहेर बये, योग्य अशा काला या ' ॥ २२ ॥

हें मी वदतां ' काशी केवल ' कविता जन्मा आली ;
तात्यादिक मंडळि ती वाचुनि चित्तीं मुदित जहाली. ॥ २३ ॥

भिडे हरीनें दोनचार प्रति लिहुनी आनंदानें
उपकृत केलें, तोषविलें मज गाउनिया बंद्यानें. ॥ २४ ॥

आनंदीसह शंकरराया विनोद आवडला न
असें न वाटे म्हणुनी कृष्णासाठीं पुढची छान ॥ २५ ॥

' ठीक वैनि ' ची आर्या लिहिली; धीट जहालों फार
म्हणुनी स्फूर्तीनें माझ्या मीं ' मधुविधु ' चा सत्कार ॥ २६ ॥

केला ; ऐकुनि वाचुनि हंसती, वदति न कांहीं कोणी ;
मान्य न जें सामान्यभाषणीं स्वैर तिथें कविवाणी. ॥ २७

लोभ फार मजवरति खरें हें, तरि ही कविता केली
म्हणुनिच वाटे लोनावळिला शंकर जातेवेळीं, ॥ २८ ॥

ब्रा मज आमंत्रण येण्या बहु आग्रहपूर्वक देई-
ताइड ही त्याची या कृतिला तकरार न मुळिं घेई. ॥ २९ ॥

शंकरसंमतशिष्टाचाराविरुद्ध हें असतांही
दोघांनीं मज बहु लोभानें नाहीं म्हटलें नाहीं. ॥ ३० ॥

त्वमहंचाहंत्वंचाहंत्वंचत्वमहंचान्योऽन
मधुविधुचा हा प्रथम मंत्र, तो साहेब असा कोण ॥ ३१ ॥

आंग्लाचारप्रवीण देइल वाग्यात्वरि धाडून ?
तरी अशा या शिष्टनीतिचें उल्लंघनहि करून, ॥ ३२ ॥

मावसभाऊ माझा शंकर दावी बंधुप्रेम.
अथवा कारण असेल दुसरें ! काय असे हो नेम ? ॥ ३३ ॥

गोदावर्या दक्षिणतीरें साधेपण उकलून
शंकरराया ये असुच्या, हें चुकलें पूर्ण कळून. ॥ ३४ ॥

रुमाल कसला तरी शिरावरि, पैरण सैल गळयांत,
बेढब अंगीं कोट, बावळट धोतरही पायांत, ॥ ३५ ॥

वहाण तुटलेल्या वाद्यांची, देशी बीडि मुखांत,
रूप पाहुनी मुलें मुलीही घालिति बोट मुखांत, ॥ ३६ ॥

'इश् नव्हे गे, हा साहेब न, भोळी हो मी नाहीं!'
'खरेंच माझ्या शपथ गळयाची, सुटली म्हण मी कांहीं ॥ ३७ ॥

खोटें सांगत नाहीं मी गे, विचार तरि दादाला.'
मुली बोलती या परि पाहुनि असुच्या साहेबाला. ॥ ३८ ॥

'साधेपण किति, विनय कितीतरि' या परि म्हणती कोणी
उलटहि कोणी, म्हणती जन हें हेंही तेंही दोन्ही. ॥ ३९ ॥

असो, जाहलें विषयांतर हें मनांत नसतांनाही.
गातां गातां बेसुर गवई घेत न कां ताना ही? ॥ ४० ॥

कुठें बरें मी आलों होतों? हाँ आठवलें आतां,
लोनावाळिला आम्हि निघालों तेथें जातां जातां ॥ ४१ ॥

स्टेशनावरी रंगूताई अग्निवहन निघतांना
'नको नको हो आजि परीक्षा' असें म्हणत असतांना ॥ ४२ ॥

अक्का आग्रह करितां आल्या, मोद होइ सकलांला.
जाउ नये ब्राह्मणत्रयांनीं मान मिळे नियमाला. ॥ ४३ ॥

आनंदीबाईला पाठीराखण रंगूताई;
जुनें सोडिलें सगळें हीही हुरहुर उरली नाहीं. ॥ ४४ ॥

वरास पाठीराखा मी मग म्हणुनी सुचविति कोणी,
हें इंटरप्रिटेशन् ही मज संमत होय म्हणोनी, ॥ ४५ ॥

मी हंसलों ; बहुजनक्षुण्णपथ सोडुनि जाणारानें
सोसावें जन जें जें वदती तें तें निमुटपणानें. ॥ ४६ ॥

स्त्रीपुरुषांचे हक्क असावे समान म्हणणारांनीं
नरहक्काची हानि पहावी कशि अपुल्या नयनांनीं ? ॥ ४७ ॥

नव्याजुन्याचें यापरि सुंदर मिश्रण अयत्या काळीं
होउनि, गाडी लोनावळिला जाण्यासाठिं निघाली. ॥ ४८ ॥

आलें स्टेशन, होते तेथें मिस्टर मोरूभाऊ.
या संतत अनलस पुरुषाचे गुणगण किति मी गाऊं ! ॥ ४९ ॥

स्टेशनावरी कामकाज तें कांहीं नसतांनाही,
गाडी एकहि मोरूभाऊवांचुनि हालत नाहीं. ॥ ५० ॥

यांनीं आम्हां हिंदकिंकरनिवासस्थानीं नेलें ;
चहापान मग शीण हराया आम्ही मिळुनी केलें ; ॥ ५१ ॥

सायंकालीं मंदसमीरणसेवनसुख घेण्यातें
गेलों तेव्हां 'धूम्रपान' ही सुचली कविता मातें. ॥ ५२ ॥

प्रसंग खोटा नच, मूळ खरें, केलें त्यावरि भाष्य
कविस्फूर्तिनं, आजहि मज तें आनंदींचें आस्य ॥ ५३ ॥

पूर्ण आठवे, रंगूताई करिती जें मग हास्य
तेंही नयना पुढती माझ्या वाटे करितें लास्य. ॥ ५४ ॥

लोनावळिचा दिवसक्रम मी आतां सांगायाचा,
थोडक्यांत तो, मध्यबिंदु या सकल सौख्यलयाचा ॥ ५५ ॥

शंकर, त्याच्याभोंवति घिरट्या घालित आम्ही होतों ;
सूर्य एकला ग्रहमालेला शोभा, चालन देतो. ॥ ५६ ॥

सोशल् पत्रव्यवहाराचें पाठ वधूला द्यावें,
किंवा रंगूताइबरोबर लॉजिक् कांहिं करावें, ॥ ५७ ॥

१६८८

मोरूभाऊंना वा स्यानीटेशन् ही शिकवावें,
आपटे तात्यांना सांगावें नाटक केंवि लिहावें, ॥ ५८ ॥
टाटावाटरवर्क्सविषयक प्रश्नं वा अडवावें,
त्रासांतुनि यमकादिक वा मज मुक्त कराया यावें, ॥ ५९ ॥
अखंड वा वाग्गंगौघानें भक्तजना भिजवावें,
साहेबानें सर्वांना या परि आम्हां रमवावें. ॥ ६० ॥
एवंगुणगणविशिष्टशक्त्या मीं तरि थक्कचि व्हावें.
आय् सी. एस्. ला अमुक न ये हें मी पण केंवि म्हणावें! ॥ ६१ ॥
गेला यापरि आनंदानें लोनावळिचा काल.
स्मरती मजला गोष्टी सगळ्या जणुं घडल्या कीं काल. ॥ ६२ ॥
'बिहारांत' ही कविता केव्हां लिहिली मज अठवेना ;
बहुतकरूनी धारापुरिला गाडींतुनि येतांना ॥ ६३ ॥
रचिली वाटे, शंकरराया पुशिलें तरि सांगेल.
कारण, वृत्तादिकांत माझ्या घालुनि देण्या मेळ ॥ ६४ ॥
यावें त्यानें सतत असें हे स्मरतें मजला नीट ;
नातरि ही मम खव्याळ कविताकामिनि कुठली धीट? ॥ ६५ ॥
ही मम गृहिणीसम लाजाळू वदन न कवणा दावी
भाषण ज्यांनीं इचें ऐकिलें शपथ तयांनीं घ्यावी! ॥ ६६ ॥
केव्हां तरि मी खरडत असतां कांहीं, मज पाहोनी
आनंदीनें पुशिलें मजला भ्रुकुटी चढवुनि दोन्ही ॥ ६७ ॥
'कवन चाललें काय?' म्हणोनी, तेव्हां प्रश्नाला मीं
'कविला उत्तर' कविता लिहुनी उत्तर दिधलें नामी. ॥ ६८ ॥
पटलें किंवा नाहीं पटलें पाहत बसतो कोण ?
सृष्टि कवीची बदलवि सगळा मानवदर्शनकोण. ॥ ६९ ॥

काव्य ५९०

वधूवरांना कोप न यावा म्हणुनी केली होती
प्रथमारंभिंच ' कवी विनंती ' क्रमाक्रमानें ये ती ॥ ७० ॥

आतां आहे त्या स्थानीं, मग पुढील पद्यें केलीं
परवा दीपावळींत कविला स्फूर्ती आल्यावेळीं. ॥ ७१ ॥

मागें एक्या काळीं कोणी जाया परत मिळाया
दिवाणींत जाई तों गेलें आयू त्याचें वाया, ॥ ७२ ॥

हुकूम ये मग करीं सुताच्या त्याच्या, म्हणुनी कोणी
सांगत होते, हसूं कोसळें गम्मत ही ऐकोनी ; ॥ ७३ ॥

तशीच माझीही गत झाली काव्य पुरें करण्यांत
शंकरपरिणयकालीं केली यातें मी सुरुवात, ॥ ७४ ॥

तरि अजुनीही हें संपेना गुऱ्हाळ एरंडाचें
अभिनंदन करण्याचें आले दिन शंकरतनयाचें ! ॥ ७५ ॥

माझी मातुलकन्या वेणूताई ' कविता मातें
रुचल्या ' म्हणता श्रीपादण्णा या पत्नीवचनातें ॥ ७६ ॥

' मम ' म्हणुनीया संमति देती ; पथ्य मला झालें हें ;
आत्मन्यप्रत्ययचेतः स्थिर होई व्यक्तस्नेहें. ॥ ७७ ॥

चिरंजीव गणपति मम बंधू ' कविता, बाळूदादा
कितीक मागति मजजवळीं मग पाहुनि दिन एखादा ॥ ७८ ॥

छापवुनीया कां काढाना ! ' ऐसें मजसि विचारी,
मनांत माझ्याही तें होतें केली म्हणुनि तयारि. ॥ ७९ ॥

मामेभाऊ गणपति माझा प्रेमभरित चित्तानें
कौतुक करि, तों लौकिक मीही भरलों अभिमानानें ; ॥ ८० ॥

तेंवि अनायासें मज होती सवड छापखान्याची
म्हणुनी खटपट कोरे कागद काळे ही करण्याची. ॥ ८१ ॥

मारुतीचें शेंपूट, पोतडी वा
गारुड्याची, ही एक गोधडी वा
दरिद्र्याची, धुडगूस गोंधळयाचा
होल्डआल् वा साहेबशंकराचा. ॥ ८२ ॥

काव्य आहे हें काय मज कळेना ;
नांव द्यावें या काय तें सुचेना ;
म्हणुनि दिधलें अभिधान यास कांहीं
उचित अनुचित कीं वाचका न पाहिं. ॥ ८३ ॥

नीर टाकुनिया क्षीर सेवण्याची
विनति आतां मी तुजसि करायाची ;
परंतू तूं हंस वा हिंसकांत
गणति होई तव, हें न मला ज्ञात ॥ ८४ ॥

असो, घटकाभर तुजसि सशयाचा
लाभ देऊं, परि काय पुढें त्याच्या ?
नीर नीरस निर्भेळ निखिल येथें
क्षीरकणलवशंका न मला येते. ॥ ८५ ॥

व्यर्थ धरुनी अभिमान मग कशाला
शिणविसी तूं तव बुद्धिवैभवाला ?
सुदामन्गृहिं सुग्रास सेवण्यास
हरी जाई कां धरुनि मनीं आस ? ॥ ८६ ॥

वाच अथवा टाकूनि पुस्तका दे
परी टीका मी करिन अशा नादें
वेड लावुनिया आपणा न घेई
ना तरी तूं कविहूनि चतुर केंवि ? ॥ ८७ ॥

# शंकरपरिणय.

काव्य नं. ४९०

काशीभ्रम : —

काशी केवल दक्षिणेंत दुसरी कोल्हापुराख्या पुरी
टाकोनी स्वजनासि तेथुनि पळे जो उत्तरेला दुरी
तो हा शंकर आज कां परतला लंघोनि गोदावरी
आनंदीं कवण्या पुण्यांत रमला ? काशी दिसे तीसरी. ॥ १ ॥

ठीक वैनी : —

जो जो प्रश्न करावा तों तों ' हां ठीक ' या असें वदति
म्हणुनीच ' ठीक वैनी ' ठेवी हें नांव यांस कृष्णमति. ॥ २ ॥

मधुविधु (Honeymoon) :—

प्रखर विष पिवोनि ताप झाला मनाला
म्हणुनि स्वशिरिं घ्यावें लागलें जाह्नवीला
तरिहि वरति चंद्रा अर्धनारीनरेश
तळमळ शमवाया ठेवि, हें काय क्लेश ? ॥ ३ ॥

नवलचि अथवा तें यांत कांहीं नसावें
जरठमति अशा त्या शंकरा काय ठावे ?
मधुविधुमधु हा संतप्तजीवा विसावा
सुगमतम असा हा शोध तेव्हां नसावा. ॥ ४ ॥

धूम्रपान : —

अस्ताव्यस्त समस्त कुंतलकुलें कां जाहलीं चंचल ?
दोन्ही ओष्ठ मिटोनि झांकिति बळें कां दंत ते निर्मल ?
किंचित्त्रस्त विशाल भालिं भ्रुकुटी कां नर्तनातें करी ?
नासा ही असुनी स्वभावसरला कां वक्रमार्गा वरी ? ॥ ५ ॥

काडी ओढुनि सीगरेट धरूनी जों पेटवी शंकर
तों नेला तिकडेच धूर अनिलें ओढोनिया सत्वर.
आनंदी वदली सखीस अपुल्या ' रंगे, किती हा तरी
वारा उद्धट पाहिं बाइ अबलाचेष्टा कशी तो करी ' ॥ ६ ॥

विहारांत :—

तुझें गडबडींतलें मधुर बोबडें बोलणें,
पतीस तव आवडेल मज हें नको सांगणें.
परंतु वदना कधीं करुनि वक्र किंकाळणें,
कधीं मिटुनि ओष्ट ते हळुच शब्द उच्चारणें, ॥ ७ ॥

अशी अति अपूर्व ही विनयपूर्णवाग्वाहिनी
उदारमतिकिंकरप्रिय ब्रिटानियास्वामिनी
अनन्यगति दीन या भरतभूमिला अर्पिते,
जरी अनुसरे पती तव अशाच या रीतितें ॥ ८ ॥

बिहारिं, तरि तें रुचेल तुज कां असा संशय
मनीं मम शिरे, विवेक इतुक्यांत सांगे ' भय
नको किमपि हें, सती भरतभूतलीं या सदा
पतिप्रियरता, विरोध मनिं आणिती ना कदा ' ॥ ९ ॥

कवीला उत्तर :—

मेला इश् असा कसा तरि कवी भारीच हा वात्रट.
झाली शर्थ, मुळीं न ताळ उरला, जोडोनिया टऽस ट
काव्यें काय करी ? विदूषक खरा हा एक वाटे नट
भोळा हा इकडे स्वभाव, न कळे कांहीं कसें वाटत ! ॥ १० ॥

कवीचि विनंति :—

कठिण मृदु वा कांहीं गेलें असेल उणें पुरें.
विरसकविला छंदोबंधीं विचार अरे, तुरे.

म्हणुनि सखया कोपा मानूं नको मनिं शंकरा.
उभय मिळुनी संसारातें सदैव सुखें करा. ॥ ११ ॥

## आशीर्वाद व आशा :—

पतिहिततत्पर सति जरि पतिही स्वकलत्ररत न अन्यत्र
मग काय न्यून्य त्या गृहिं ? नांदतसे मूर्तिमंत सुख तत्र. ॥ १२ ॥

आनंदी आनंदा देवो, शंकर सदैव शंकर हो,
संततिसंपद्युक्ता यात्रा संसारिं यांसि सुखकर हो. ॥ १३ ॥

स्वत्वध्वंसा कारण भलत्यासलत्या अनेकविध नाना
परकीय कल्पनांना देवा, देऊं नको शिवूं यांना. ॥ १४ ॥

आदर परकीय गुणीं म्हणजे आत्मीयजनतिरस्कार
विपरीत करुणपर हा यांच्या होवो मना न संस्कार. ॥ १५ ॥

जो हिंदभूमिकिंकर म्हणवुनि मानीत धन्य अपणातें
त्या गोपालाची ही कन्या विसरूं नका बरे, नातें. ॥ १६ ॥

पदवी जितुकी मोठी कर्तव्या वाव अधिक तितुका तो
नाहीं तरी दरिद्री मांडे कां मनिं कधीं कमी खातो! ॥ १७ ॥

ही जाणीव असूंदे उभय मनीं, सतत हाच उपदेश
करि मी, वडील निज, परि अधिकाराचा उगीच हा वेश. ॥ १८ ॥

## समारोप :—

कांहीं विनोद कांहीं मूर्खपणा धैर्य धाष्टर्य अनिवार,
उपदेश अल्प, तरिही प्रेमरसाचा यथेच्छ भडिमार, ॥ १९ ॥

अठरा धान्यांचें हें कडबोळें यापरी दिवाळींत
करुनी मी आनंदीशंकर या जोडप्यास वाढीत. ॥ २० ॥

शंकरराया, तुजला गोड न अवडे म्हणूनि कडबोळें
तिखट मिठाचें केलें. पतिचें प्रिय निजसतीसही चाले. ॥ २१ ॥

आनंदीबाईला अथवा ओवाळणी दिवाळींत
मी हीच पद्यरूपीं प्रेमानें आरतींत घालीत. ॥ २२ ॥

दान न मन दात्याचें दानाची थोरवी खरी दावी ;
मग ही नीरस पद्यें तिजला कां नच अमोल्य वाटावीं ? ॥ २३ ॥

कविस्थान काल व नामनिर्देश :--

धारवाडपुरींत मंगळवारपेठांतर्गता
एक गल्ली विलसते देसाइपूर्वपदांकिता.
अत्र नगरसलापहारिसरित् त्यजूनि अलीनता
वाहतां मधुगंध पसरे मंदमंद इतस्ततः. ॥ २४ ॥

सदा तत्र भुक्तावशिष्टान्नसंग
मनोहारि पत्रावळीसंघ दंग
करी चित्त तन्मार्गगामीजनाचें.
मरुत वाहतां ती सुखेनैव नाचे. ॥ २५ ॥

अडविते पदिं आड पडोनिया,
तनुस झोंबत लाड करोनिया,
वदनचुंबनधीट कदा कदा
स्मरहता प्रमदा जशि तापदा. ॥ २६ ॥


अपत्यप्रेमानें हृदय अगदीं पूर्ण भरलें,
मुलेंबाळें जें जें करिति सगळें इष्ट गमलें;
तरी दारोदारीं म्हणुनिच इथें स्पष्ट दिसतीं
सदा हीं चिन्हें जीं जननयननासा रमवितीं. ॥ २७ ॥

श्वानरासभहिंदवीथीनाथवृंद निशीदिनीं
फिरति लोकारोग्यरक्षणदक्ष या वीथींतुनी.
नगरपरिषत्कार्यभारा हात लावुनिया क्षणी
स्वार्थ साधुनिही परांना करिति उपकारें ऋणी. ॥ २८ ॥

दिनमणि रवि अस्ता चालला ये त्रियामा
म्हणुनि सकल कामें संपवोनि स्वधामा
थकुनि परत येती शांतता सेवण्यास
पुढति तरि तयांच्या सिद्ध हे डांस दास ॥ २९ ॥
श्रवणमधुरगानें मानसा तोषवीति
पदयुग उघडें ना ते कधीं सोडितात‍ि.
अविरत प्रभुसेवा सेवका हेंच ध्यान,
गणत न किमपी तो त्यापुढें प्राणदान. ॥ ३० ॥
त्यजुनिया ऋजुता धरि वक्रता,
सखल उंच गमे पदिं पाहतां.
पथ न हा पथ हा जगदर्पण,
मज गमे मुळिं संशय यांत न.

REFBK-0001688
REFBK-0001688

अशा या दिव्य वीथींत जठारांचें असें घर,
शोभें ज्याचें महाद्वार त्या नदीचे तटावर. ॥ ३२ ॥
रम्य शोभा दिसे, गंध मंदमंद चहूंकडे
पसरे, तों कविस्फूर्ती कवीला कां कमी पडे ? ॥ ३३ ॥
स्फूर्तिदायक या स्थितींत जठारघरिं माडीवरी
शुद्धकार्तिकपंचमी, सिद्धार्थिशक, बुधवासरीं
पूर्ण करि आनंदिशंकरदंपतीस्तव हें नव
कवन कवि यशवंत भास्करसुत जठारकुलोद्भव. ॥ ३४ ॥



ग्रंथालय
दा. क्र. १६८८